क्रमांक पीएसपी-०४१६/सीआर-८६/२०१६/तीन दिनांक- २१ डिसेंबर, २०१६

# घोषणा

## पोलीस उपनिरीक्षक पूर्व परीक्षा २०१६
## कमाल वयोमर्यादा वाढीबाबत

पोलीस उपनिरीक्षक पूर्व परीक्षा-२०१६ करिता दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस (जाहिरात क्रमांक ५४/२०१६) अनुसरुन कमाल वयोमर्यादा दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजी अमागास उमेदवारांकरीता २८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांकरीता ३१ वर्षे निश्चित करण्यात आली होती. आता शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पीएसबी-०३१४/प्र.क्र.३५४ ( भाग-२)/पोल-५अ दिनांक १९ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रस्तुत पोलीस उपनिरीक्षक पदावरील भरतीकरीता कमाल वयोमर्यादा अमागास उमेदवारांकरीता ३१ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांकरीता ३४ वर्षे अशी सुधारीत करण्यात आली आहे. त्यानुसार प्रस्तुत पोलीस उपनिरीक्षक पूर्व परीक्षा-२०१६ करिता दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन कमाल वयोमर्यादा दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी अमागास उमेदवारांकरीता **३१ वर्षे** व मागासवर्गीय उमेदवारांकरीता **३४ वर्षे** अशी राहील.

२. वयोमर्यादा वाढीमधील उपरोक्त निर्णयामुळे पात्र उमेदवारांना अर्ज सादर करण्याकरीता खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे :-

(१) विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकीरता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ३१ डिसेंबर,२०१६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

(२) चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ०२ जानेवारी ,२०१७ पर्यंत बँकेच्या कार्यालयानी वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

ठिकाण : मुंबई

सु.ह.अवताडे
अवर सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग